दै. मराठवाडा नेता. दि: ०४/०३/२०२४

# वाहतुकीचे नियम मोडणाऱ्या वाहनधारकांकडुन ८१ लाखाचा दंड वसूल

नांदेड (म.नेता)

वाहतुकीचे नियम मोडणाऱ्या वाहनधारकांकडुन शहर वाहतूक शाखेच्या पोलिसांनी एकाच महिन्यात तब्बल ८१ लाख रुपयांच्या वर दंड वसूल केला असून ७ हजार ८०० वाहनधारकांवर कारवाई करून हा दंड वसूल करण्यात आला आहे.नांदेड शहरातील बेशिस्त वाहतूक व्यवस्थेचा फटका अनेक सामान्य नागरीकांना सहन करावा लागतो. पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी शहरातील वाहतूक व्यवस्था सुरळीत करण्यासाठी अनेक उपाय योजना केल्या आहेत. मात्र अनेक वाहनधारक वाहतुकीचे नियम मोडतात त्यांच्यावर कारवाई करण्याचे आदेश पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी दिले होते.

शहर वाहतूक शाखेचे पोलिस निरीक्षक सुर्यमोहन



बोलमवाड यांना आपल्या सर्व सहकारी यांना आदेश देऊन वाहतुक सुरळीत करण्यात यावी व नियम मोडणाऱ्या वाहनधारक यांच्यावर कारवाई करावी असे आदेश दिले होते. १ फेब्रुवारी २०२४ ते २९ फेब्रुवारी २०२४ पर्यन्त एका महिन्यात मोठी मोहीम राबविली होती. या एका महिन्यात वाहतूक शाखेच्या पोलिस कर्मचारी यांनी ७ हजार ८०० वाहनधारक यांच्यावर कारवाई करुन ८१ लाख १२ हजार २०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे.

त्याचप्रमाणे वाहनांच्या सायलेन्सर मध्ये बदल करणार्या ७८ वाहनधारकांवर कारवाई करण्यात आली आहे.

यापुढे वाहतूक नियमांचे पालन केले नाही तर नियम मोडणाऱ्या वाहन धारकांवर कठोर कारवाई करण्याचा इशारा पोलिस निरीक्षक सुर्यमोहन बोलमवाड यांनी दिला आहे.